वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.NO.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरुवार दि.९ ऑक्टोबर २०२५ पाने ४ किंमत ३

# देश जाती-धर्मावर चालतो, संविधान मान्य नाही

## सरन्यायधीश भूषण गवईंवर बूट फेकणाऱ्या वकिलाचे खळबळजनक विधान

Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## बुट फेकणाऱ्याला भेटण्यासाठी खा.निलेश लंकेंनी दिल्लीत गाठले



राकेश किशोर यांच्याकडून घडलेली घटना संकुचित आणि मनुवादी विचारांमधून घडलेली घटना आहे. संविधानाचा त्यांना कुठेतरी त्यांना विसर पडला आहे. त्याची त्यांना पुन्हा जाणीव करून देण्यासाठी इथे आलो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे संविधान निर्माण केले. संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाची आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याबाबत जो प्रकार घडला, तो एका व्यक्तीचा अवमान नसून संपूर्ण देशाचा अवमान होता. जे कृत्य घडले, त्याचा शांततेच्या मार्गाने निषेध करण्यासाठी आंबेडकरांचा फोटो आणि संविधानाची प्रत घेऊन येथे आलो, अशी माहिती खासदार निलेश लंकेंनी दिली.एका याचिकेवर सुनावणी सुरू असताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी पुन्हा एकदा या घटनेवर भाष्य केले. सोमवारी जे घडले, त्याने आम्ही सगळेच काही काळ स्तब्ध झालो होतो. मात्र आता तो आमच्यासाठी एक संपलेला धडा आहे. बूटफेकीच्या प्रकारानंतर सरन्यायाधीश हे अविचल होते. त्यांनी कामकाजही थांबवले नाही. अशा घटनेने कोणीही विचलित होऊ नये, आम्हीही झालेलो नाही. अशा घटनांचा माझ्यावर काही परिणाम होत नाही, अशी प्रतिक्रिया सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दिली होती. सरन्यायाधीश गवई यांनी वकिलाविरुद्ध कोणतीही तक्रार दाखल केली नाही. उलट, अधिकाऱ्यांना इशारा देत त्यांना जाऊ देण्यास सांगितले.

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकल्याच्या घटनेने संपूर्ण देश हादरला. गवई यांच्यावर ६ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात बूट फेकण्याचा प्रयत्न झाला. सर्वोच्च न्यायालयातील ७२ वर्षीय वकील राकेश किशोर याने हे विकृत कृत्य केले. या कृत्यावर देशभरातुन संताप्त व्यक्त केला जात होता. तसेच, या वकिलावर कठोर कारवाईची मागणी देशभरातून करण्यात आली. मात्र, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मनाचा मोठेपणा दाखवत बूट फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या माथेफिरु



वकिलाला माफ करण्याचा निर्णय घेतला. यानंतर वकील राकेश किशोर यांनी आपल्या कृतीवर माफी मागायचे सोडून ▶▶ पान २ वर

### तिथे गेल्यावर माझ्यातील भगतसिंग जागा झाला

मी वकील राकेश किशोर यांना फोटो आणि संविधान भेट दिले आहे. त्यांनी संविधान मान्य नसल्याचं मला सांगितलं आहे. तसेच हा देश संविधानावर नाही तर जाती-धर्मावर चालतो असं ते म्हणाले. मी गांधीवादी भूमिकेतून राकेश किशोर यांच्याकडे गेलो होतो. पण तिथे गेल्यावर माझ्यातील भगतसिंग जागा झाला आणि मी त्यांना ठणकावून संविधानाची जाणीव करून दिली, अशी माहितीही निलेश लंके यांनी दिली. तसेच, सरन्यायाधीशांनी भगवान विष्णू यांचा अवमान केला, असा दावा राकेश किशोर याने मला सांगितले.

## जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम फक्त कागदावरच

## शासनाच्या कोट्यावधीच्या निधीची लूट-अॅड.इरफान बागवान



बीड, (दिव्य न्युज):- जिल्ह्यात शासनाच्या अत्यंत चांगली व बालकासाठी वरदान ठरणारी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम ही योजना फक्त कागदावरच दिसून येत असून या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात ७० ते ८० लोकांच्या नियुक्त्या केलेल्या असून त्यात डॉक्टर फार्मासिस्ट स्टाफ नर्स व इतर लोकांच्या नेमणुका केलेल्या असून एन एच एम च्या अधिपत्याखाली सदरील योजनेसाठी कोट्यावधीचा निधी शासन खर्च करत असून यातील डॉक्टर व इतर कर्मचारी यांना भरपूर पेमेंट देण्यात येत आहे या सर्वांनी संगणमत करून फक्त कागदावरच ही योजना राबवित आहेत या योजनेत जिल्ह्यात वेगवेगळ्या टीम बनवून प्रत्येक अंगणवाडी अथवा बालवाडी येथे विजिट करून भेट करणे बंधनकारक असून तेथील मुलांची तपासणी करून त्यांना काही असाध्य रोग किंवा आजार आहेत का याच्या विविध चाचण्या करणे गरजेचे असताना व विजीट करण्यासाठी प्रत्येक टीम करिता फिरण्यासाठी गाड्यांचे ही वेगळे टेंडर करण्यात आलेले असूनही सदरील नेमणूक केलेले डॉक्टर फार्मासिस्ट व इतर स्टाफ हे कोणतेही तपासणी न करता सदरील विजीटच्या ठिकाणी कधीतरी जाऊन तेथील अंगणवाडी अथवा बालवाडी च्या हजेरी रजिस्टर ची फोटो घेऊन त्यात उपलब्ध सर्व माहिती घेऊन सदरील योजना ही फक्त कागदोपत्री राबवीत आहेत तसेच ड्युटीला जिल्हा रुग्णालय परिसरात जाऊन फक्त अॅप द्वारे हजेरी लावून परत आपल्या खाजगी दवाखान्यात प्रॅक्टिस करीत आहे.

वरील कार्यक्रमासाठी नियुक्त कर्मचाऱ्यावर कोणाचेच अंकुश नसल्यामुळे सदरील कर्मचारी फुकटचे पेमेंट उचलत असून काहीच कामे न करता फक्त कागदोपत्री माहिती भरून शासनाची फसवणूक ▶▶ पान २ वर

## विद्यार्थिनीला जातिवाचक शिवीगाळ करत हॉल तिकीट नाकारले

### संस्थाचालकाच्या विरोधात गुन्हा नोंद

बीड , (दिव्य न्युज):- मागील वर्षाच्या प्रवेशाचे पैसे भर, अन्यथा तुला हॉल तिकीट मिळणार नाही, असे म्हणत विद्यार्थिनीला जातिवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी वडवणी पोलिस ठाण्यात संस्था चालक दिलीप रघुनाथ मुंडे यांच्याविरुद्ध ट्रॉसिटीनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वडवणी येथील रहिवासी विद्यार्थिनीने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात वडवणी येथील समर्थ नर्सिंग कॉलेज येथे एएनएम या कोर्ससाठी प्रवेश घेतला होता. प्रवेशावेळी संस्था चालकांकडून प्रवेश शुल्क आणि परीक्षा फीस कुठलीच लागणार नाही, असे विद्यार्थिनीला सांगण्यात आले होते. तसेच मोफत शिक्षण दिले जाईल, असे सांगितले होते. फक्त समाज कल्याणकडून येणारी स्कॉलरशिप कॉलेजला द्यावी लागेल, असे सांगितले होते. पान २ वर

## बार्शी नाक्यावर दीड तासाची वाहतूक कोंडी

### तिन्ही प्रमुख रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच रांगा

### वाहतूक पोलीस फक्त पावत्या फाडण्यासाठी



बीड, (दिव्य न्युज):- कायदा व सुव्यवस्थेसह वाहतूक व्यवस्थापनाबाबत सातत्याने पोलिसांच्या दुर्लक्षित कामकाजामुळे त्यांच्यावर आरोप होतात. आज सकाळी बार्शीनाका परिसरात तब्बल एक ते दीड तास वाहतूक कोंडी झाल्याने तीनही प्रमुख रस्त्यांवर वाहनाचंया लांबच्या लांब रांगा लागल्याचे दिसून येते. वाहतूक पोलीस त्यांना दिलेल्या पॉईंटवर कधीही हजर नसतात. केवळ पावत्या फाडण्यासाठी एखादा कोपरा पाहून उभे राहतात, असा आरोप करत आज सकाळी अनेक जणांनी केवळ पोलिसांच्या दुर्लक्षपणामुळे बार्शीनाका परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे म्हटले.

आज सकाळी साडेनऊ ते अकराच्या सुमारास बार्शीनाका या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली. बार्शीनाका परिसरात परळीकडून मोठ्या प्रमाणावर वाहतूक असते. त्याचबरोबर धुळे-सोलापूर महामार्गावरचा हा बीड शहरामधील पहिला प्रमुख चौक आहे. याठिकाणी पोलीस चौकी गेल्या कित्येक वर्षांपासून आहे. पोलीस चौकीत पोलीस कधी दिसून येत नाहीत. वाहतूक सुरळीत करण्यासाठी या चौकात कधी पोलीस उभा राहिलेला क्वचित दिसतो. पावत्या फाडण्यासाठी लॉ कॉलेज आणि इकडे तेलगावनाका चौक या भागात मात्र पोलीस आढळून येतात. आज जेव्हा वाहतूक कोंडी झाली ▶▶ पान २ वर

## घरफोडी करणाऱ्या आरोपीस बारा तासांत अटक; मुद्देमालही केला जप्त



बीड , (दिव्य न्युज):- शहरातील स्वराज्यनगर भागातील आकाश कातांगडे यांच्या घरी दि. ६ ऑक्टोबर रोज रात्री चोरी झाली होती. या प्रकरणातील आरोपीला शिवाजीनगर पोलिसांनी अवघ्या बारा तासांत अटक केली आहे. त्याच्याकडून सोन्याच्या दागिन्यासह दोन मोबाईल देखील जप्त करण्यात आले आहेत.

बीड शहरातील स्वराज्यनगर भागातील आकाश कातांगडे यांच्या घराच्या ग्रीलचे गज कापुन अज्ञात चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने व दोन मोबाईल लंपास केले होते. या प्रकरणात गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गजानन क्षीरसागर, रवि अघाव, ज्ञानेश्वर मराडे, अशोक राडकर, बाळु ▶▶ पान २ वर

## एटीएमची अदलाबदल करून हजारो रुपयांची फसवणूक

बीड , (दिव्य न्युज):- शहरातील स्वराज्यनगर भागातील एसबीआय बँकेच्या एटीएममध्ये ग्राहकाचे एटीएम कार्ड बदलून अज्ञाताने ३६ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

बीड शहरातील स्वराज्य नगर परिसरातील एसबीआयच्या एटीएममधून शनिवार (दि.४) दुपारी ३ च्या सुमारास मोमिन नवीद कैसर अब्दुल सईद (वय ४०) रा. मोमीनपुरा हे स्वराज्य नगर भागातल्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी आले. आपल्या खात्यातून त्यांनी पैसे काढले आणि दवाखान्यात गेले.मात्र तेवढ्या वेळात त्यांच्या खात्यातून ३६ हजार रुपये काढले जात असल्याचे मॅसेज आले. आरोपीने मोमीन नवीद कैसर हे जेव्हा एटीएममध्ये होते तेव्हा त्यांचा चोरून पीन पाहिला ज्यावेळी मोमीन यांचे कार्ड मशीनमध्ये होते. त्या वेळी आरोपीने कार्डची अदलाबदल करत मोमीन यांना स्वत:जवळील बनावट कार्ड दिले . त्याच वेळी मोमीन यांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी मोमीन यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिसत ठाण्यात बुधवार (दि.८)रोजी गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास पोलीस करत आहेत. ▶▶ पान २ वर

### पिंपळटक्का ग्रामसभेत गोंधळ

## ग्रामसेवकाला धमकी देत केली शिवीगाळ

वडवणी , (दिव्य न्युज):- पिंपळटक्का गावातील ग्रामसभेदरम्यान ग्रामसेवकासमोर अरेरावी करून सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एका इसमाविरुद्ध वडवणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना ६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पिंपळटक्का ग्रामपंचायत कार्यालयात घडली. फिर्यादी आकाश सुधाकर शिंदे (वय ३५, व्यवसाय - नोकरी, रा. शिवणी, ता. बीड) हे ग्रामसेवक म्हणून ग्रामसभा घेत होते. सभेदरम्यान आरोपी हनुमंत रामेश्वर कदम ▶▶ पान २ वर

## राजस्थान राज्यात धर्मातरणचा कायद्यावर स्वाक्षरी करून पास करणारे राज्यपाल उद्या बीडमध्ये

### राजस्थानात धर्मांतरण कायदा लागू




मुंबई, (वृत्तसेवा):- राजस्थानात आत धर्मांतरण विरोधी कायदा लागू झाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून यासंदर्भात राजकीय वाद आणि चर्चा सुरू होती. मात्र अखेर आता यासंदर्भातील विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आहे. राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी राजस्थान विधि विरुद्ध धर्म समपरिवर्तन अधिनियम, २०२५ ला मंजुरी दिली असून, आता हा कायदा राज्यात लागू झाला आहे. महत्वाचे म्हणजे, जबरदस्ती, आमिष दाखवून अथवा फसवणुकीने होणारे धर्मांतर रोखण्याच्या उद्देशाने आणलेल्या या कायद्यातील तरतुदी अतिशय कठोर आहेत.

या धर्मांतरण विरोधी कायद्यानुसार, आता दोषी आढळल्यास आजीवन कारावास आणि ५० लाख रुपयांपर्यंतच्या ▶▶ पान २ वर

## बीएएमएस चा फुल फॉर्म काय?

### आरोग्य पथकाची धाड, डॉक्टरची बोबडी वळाली

दिल्ली, (वृत्तसेवा):- विनापरवाना व्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्याने आरोग्य पथकाने ठाणेपाडा येथे धाड टाकली. यादरम्यान एक डॉक्टर दवाखाना उघडा सोडून पळून गेला. दुसरा मात्र पथकाच्या हाती लागल्यानंतर त्याचे कागदपत्र तपासले असता बीएएमएसचा फूल फॉर्म चुकीचा लिहिलेला आढळला. पथकाने त्याची कागदपत्रे तपासणीसाठी ताब्यात घेत तपासणीसाठी पाठवले आहेत. ती बोगस निघाल्यास पुढील कारवाई होणार आहे. नंदुरबार जिल्ह्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असून याबाबतचा



प्रश्न राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या दौऱ्यात निमित्तही उपस्थित करण्यात आला होता.

नंदुरबार तालुक्यातील ठाणेपाडा येथे बंगाली डॉक्टर सह अन्य एक जण विनापरवाना वैद्यकीय व्यवसाय करत असल्याने याआधीही आरोग्य विभागाने त्यांना नोटीस पाठवली होती. मात्र तरीही त्यांच्या वैद्यकीय व्यवसाय सुरू होता. या दोघांनी वैद्यकीय व्यवसायासाठी परवानगी किंवा आपली कागदपत्रे जिल्हा आरोग्य विभागाला दिली नव्हती. दोघांच्या पॅथी आणि डिग्रीबाबत गावातील काहींनी संशय व्यक्त केला करत आरोग्य विभागाला माहिती दिली.बुधवारी सकाळी नंदुरबार तालुका आरोग्य पथकाने ठाणेपाडा येथे छापा टाकला. ही माहिती मिळताच तेथून डॉ. शिरीष ▶▶ पान २ वर

# शेख मुजीब यांच्या उमेदवारीने बीडचे नगराध्यक्षपद चर्चेत



बीड, (दिव्य न्युज):- नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकीय वर्तुळात एक मोठी आणि आश्चर्यकारक चर्चा रंगू लागली आहे. ती म्हणजे, शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी आपल्या निर्भीड पत्रकारितेतून ओळखले जाणारे संपादक शेख मुजीब भाई हे आता थेट निवडणुकीच्या मैदानात उतरून नगराध्यक्षपदाची धुरासांभाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वर्षे बीड शहराचे प्रश्न मांडणाऱ्या मुजीब भाई यांनी अनेकवेळा सत्ताधाऱ्यांना त्यांच्या धोरणांवरून धारेवर धरले आहे. याच विश्वासाच्या बळावर वाढत्या आणि लोकसंपर्काच्या आधारावर, त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश करून बीडचे भावी नगराध्यक्ष व्हावे, असा आग्रह त्यांच्या हितचिंतकांकडून व नागरिकांच्या एका मोठ्या गटाकडून केला जात आहे. शेख मुजीब भाई यांच्या संभाव्य एंट्रीमुळे बीडच्या पारंपरिक राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे. ते उमेदवारी अनेक दिग्गज नेत्यांसाठी कोणत्या पक्षाकडून लढणार की अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरणार, यावर बीडमधील प्रमुख राजकीय पक्षांचे भवितव्य अवलंबून असेल. त्यांची आव्हान निर्माण करणारी ठरू शकते. जनतेच्या विकासाचे प्रश्न हाच माझा अजेंडा आहे. राजकारणात येण्याचा निर्णय हा वैयक्तिक नसून तो बीडमधील नागरिकांच्या भावनांवर आधारित असेल. योग्य वेळी मी माझी भूमिका स्पष्ट करेन,' अशी सावध प्रतिक्रिया मुजीब भाई यांनी व्यक्त केली. बीडच्या नागरिकांचे लक्ष आता मुजीब भाईंच्या अधिकृत घोषणेकडे लागले आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे ही निवडणूक निश्चितच अत्यंत चुरशीची होणार यात शंका नाही.

# डॉ.योगेश क्षीरसागरांतर्फे गणेश वाघमारे यांना न्याय देण्याची वेळ

बीड, (दिव्य न्युज):- माजी नगराद्यक्ष भारतभूषण क्षीरसागर यांचे कट्टर समर्थक असलेले गणेश वाघमारे यांना खऱ्या अर्थाने क्षीरसागर परिवारातर्फे न्याय देण्याची वेळ आली असून गणेश वाघमारे। यांच्या पत्नी व नगरसेविका पुजा वाघमारे यांना संधी दिल्यास निर्विवादपणे डॉ. योगेश क्षिरसागर यांचे हात बळकट होतील अशी अशा प्रकारचे वातावरण सध्या बीडमध्ये आहे.

गणेश वाघमारे हे गेल्या दोन दशकांपासून बीडच्या समाजकार्यात आणि राजकारणात सक्रिय आहेत. आणीबाणीच्या काळात प्रत्येकासाठी धावून जाणारा कार्यकर्ता अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यांच्या पत्नी सौ. पूजा वाघमारे या बहुसंख्य मताने निवडून येऊन नगरसेविका झाल्या होत्या. त्यांनी वार्डात केलेले समाज उपयोगी आणि विकासात्मक कार्य हा बीड शहरात एक प्रकारचा विकासाचा पॅटर्न ठरलेला होता. गणेश वाघमारे यांचे बीड शहरातील सर्व समाजाची आणि सर्व स्तरातील नागरिकांशी अत्यंत जवळचे आणि स्नेहाचे संबंध असून, त्याचा फायदा त्यांना निवडणुकीत होऊ शकतो. बीड नगरपालिकेचे अध्यक्षपद हे अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव झाल्यानंतर कालपासून गणेश वाघमारे यांना फार मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळत आहे.



अनेक लोक त्यांना त्यांच्या पत्नी पूजा वाघमारे यांना निवडणुकीत उभे करण्याचा आग्रह करतआहेत. दरम्यान आपण हा निर्णय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याशी विचार करून घेऊ, योगेश क्षीरसागर घेतील तो निर्णय आपल्याला मान्य असेल असेही गणेश वाघमारे यांनी सांगितले. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी वडील भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रमाणेच झपाटल्यागत समाजकार्य केले असून त्यांनीं कोट्यावधीचा निधी बीडच्या विकासासाठी आणला आहे त्यामुळे जनता डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या पाठीमागे मोठ्या प्रमाणात उभी राहील. दरम्यान डॉ. योगेश क्षीरसाग घेतील तो निर्णय आपण मान्य करू असहही ते म्हणाले. गणेश वाघमारे यांच्यावर बीड़ शहरातून विविध स्तरातून त्यांच्या पत्नी नगरसेविका पुजा वाघमारे यांना अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आग्रह होत आहे.

# कालिकादेवी विद्यालय कबड्डी स्पर्धेत जिल्ह्यातून अव्वल

शिरूर कासार, (दिव्य न्युज):- शिरूर (कासार) 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा विभाग,जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने, श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल,जि.बीड येथे जिल्हास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय कबड्डी स्पर्धा वयोगट १४ वर्षाखालील मुलींसाठी होती. कालिकादेवी विद्यालयाचे,प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार १४ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने सहभाग घेऊन,या स्पर्धेत 'प्रथम क्रमांक' पटकावला.यामुळे कालिकादेवी विद्यालय,बीड जिल्ह्यातून अव्वल ठरले आहे.या जिल्हास्तरीय कबड्डी



स्पर्धेत जिंकलेल्या स्पर्धकांची विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय स्पर्धेत बीड जिल्ह्यातील एकूण ११ नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे.विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे प्रा.बाळासाहेब खटाणे व श्रीराम इंगळे यांनी मुलींच्या कबड्डी स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे,बीड जिल्ह्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक झाले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील कबड्डी स्पर्धेतील स्पर्धकांना विभागीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.तेव्हा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,रवी जायभाये,राजेंद्र डोंगरे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

पान ४ वरून

## परभणी शहरातील

मयत शेख जावेद याला शिवीगाळ करून हातातील कुर्हाडीने फिर्यादी पत्नी प्रविण बेगम हिच्या समोरच तिचा मयत पती शेख जावेद शेख युसूफ याच्या गळयावर व डोक्यावर कुर्हाडीने वार केले. त्यामुळे त्याच्या गळयातून, डोक्यातून रक्त निघू लागले. यानंतर आरोपी जावेद खान हा कुर्हाड नालीत टाकून घटनास्थळावरून पळून गेला. फिर्यादीचा पती शेख जावेद यास सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले. यावरून आरोपी जावेद खान गफार खान वय ३३ ) रा.क्रांतीनगर परभणी याच्याविरूध्द भारतीय दंड विधानाच्या ३०२, ५०४ प्रमाणे तपास अंमलदार शरद जराड यांनी तपास करून आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. हे प्रकरण प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यु.एम.नंदेश्वर यांच्या न्यायालयात त्यांच्या समक्ष चालविण्यात आले. सरकार पक्षाच्या वतीने ॲड. डी.यु.दराडे, जिल्हा सरकारी वकिल यांनी या प्रकरणात एकूण ८ साक्षीदार तपासले. त्यांना या प्रकरणात कोर्टपैरवी अधिकारी पोलिस उपनिरिक्षक सुरेश चव्हाण, कोर्टपैरवी भागोजी पुंडगीर, महिला कोर्टपैरवी वंदना आदोडे यांनी सहकार्य केले. या प्रकरणी प्रत्यक्ष साक्षीदार, वैद्यकीय पुरावा आणि घटनास्थळावरून कुर्हाडीची जप्ती हा पुरावा आणि सरकारी वकिलाचा युक्तीवाद महत्वाचा ठरला. या प्रकरणी बुधवारी (दि.८ अक्टोबर ) न्यायालयाने आरोपी जावेद खान गफार खान रा.क्रांतीनगर परभणी यास अजन्म कारावास आणि दहा हजार रूपये दंड ठोठावला. तसेच दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली.

## माझा भाजप मध्ये

माजी नगराध्यक्षा सबिया बेगम कफिलूर फारुकी यांच्या प्रवेशाची खोटी बातमी देऊन जनतेमध्ये संभ्रम निर्माण करत पोळी भाजण्याचा केवीलवाणा पर्यंत करत आहेत. तसेच कुबेर हुलगुंडे यांचा देखील प्रवेश झाल्याची बदनामी केली आहे. त्याचा देखील भाजप प्रवेश झाला नाही. तसेच जिंतूर सेलू तालुक्यात रस्त्यांची दैनीय अवस्था झाली असून रस्त्याच्या कामामध्ये एक हजार कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झाला असून लवकरच आम्ही पुराव्यानीशी तक्रार करू असा आरोप यावेळी मा.आ.विजय भांबळे यांनी केला.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, माजी अध्यक्ष विश्वनाथ राठोड, केशवराव बुधवंत, जि.प माजी सभापती.रामराव उबाळे, जि.पं.सदस्य, बाळासाहेब घुगे, मुरलीधर मते, विठ्ठल घोगरे, प.स.माजी सभापती गणेशराव इलग, माजी नगराध्यक्षा सबिया बेगम कफिलूर फारुकी नगरसेवक आहेमद बागबान, शोएब जानिमिया, दलमीर पठाण, दत्तराव काळे, संजय निकाळजे, तसेच सरपंच राजेश चव्हाण, आशाताई खिल्लारे, कैलास महाराज देशमुख, पिंटू घुगे, सलीमभाई, वासेफ भाई, शौकत लाला, हकीम लाला, अर्जुन वजीर, कुबेराव हुलगुंडे, पाषा भाई, खयुम कादरी, करीम लाला, शेख हबीब, शाहेद सिद्धिकी, दिलीप माघाडे, सादेक सर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



बीड : ये भागवत तावरे है जो खूद के पार्टी के संग्राम जगताप के खिलाफ खुले मे बोल रहा है लेकिन जिनको वोट दिये वो काह है क्या वो खुलकर आय लव्ह मुहम्मद पोस्ट करेंगे . सियासत के आगे है तावरे वोट कि नही सोच कि बात करता है वो ,बेबाकी से .अल्लाह उसकी हिम्मत कायम रखे . आमीन

पान १ वरून

## देश जाती-धर्मावर

याची भेट घेतली. लंकेंनी त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आणि भारतीय संविधानाची प्रत भेट दिली. हे देण्यामागचे हेतू राकेश किशोर याला भारत देशातील संविधानाची जाणीव करून देण्याचा निलेश लंके यांचा प्रयत्न होता. किशोर याची भेट घेतल्यानंतर निलेश लंके यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, राकेश किशोर याने मला संविधान मान्य नसल्याची खळबळजनक माहिती दिली. देश जाती-धर्मावर चालतो, असेही वकील राकेश किशोर म्हणाल्याचे लंके यांनी माहिती दिली.

सरन्यायाधीशपदाची खुर्ची ही देशाची होती. त्या खुर्चीला वेगळे महत्त्व आहे. तुम्ही रस्त्यावर विरोध करायला हवा होता. तुम्ही रस्त्यावर विरोध केला असता तर आम्ही तुमचे समर्थन केले असते, असे मी त्यांना सांगितले. सोबतच, देव-देवतांवर कोणी टीका करत असेल तर आपण रस्त्यावर विरोध करू. पण त्या खुर्चीचा मान तुमच्याकडून राखला गेला पाहिजे होता. ही चुकीची बाब आहे, असेही मी त्यांना सांगितले, अशी माहितीही निलेश लंके माध्यमांशी बोलताना दिली.

## जिल्ह्यात राष्ट्रीय बाल

करीत आहेत यातही काही शाळेच्या मुख्याध्यापक व इतर अंगणवाडी सेविका व सुपरवायझर यांच्या सहकार्याने एखाद्या मुलाला काही असाद्य रोग आहे हे निदर्शनास आल्यानंतर त्यांचे मुंबई पुणे येथे ते ऑपरेशन करून स्वतःची पाठ थोपटून घेत वर्तमानपत्रात बातम्या देऊन आम्ही किती चांगले काम करत आहोत हे दर्शविण्याचा प्रयत्न करीत आहे. तरी सदरील योजनेचे अध्यक्ष हे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी असून सचिव जिल्हा आरोग्य अधिकारी आहेत परंतु या दोघांचेही या गंभीर बाबीकडे संपूर्ण दुर्लक्ष आहे.

तरी या चांगल्या योजनेचा बीड जिल्ह्यात होणारा कागदोपत्री वापर तसेच या योजनेच्या माध्यमातून नेमणुकीस असणाऱ्या डॉक्टर फार्मासिस्ट स्टाफ नर्स तसेच इतर स्टाफ व या योजने करिता होणारा बोगस औषध पुरवठा तसेच फोरविलर गाडीचे टेंडर यातून शासनाचे होणारी कोट्यावधीची लूट थांबून सदरील योजनेतील गैरव्यवहार तपासण्याकरिता एक चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी यासाठी टिपू सुलतान युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष अँड. इरफान बागवान यांनी मा. देवेंद्रजी फडवणीस मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे जर येत्या आठ दिवसात चौकशी समिती नेमण्यात आली नाही व या सर्व प्रकारात समाविष्ट असणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा टिपू सुलतान युवा मंचाचे संस्थापक अध्यक्ष इरफान बागवान यांनी दिला आहे.

## विद्यार्थिनीला जातिवाचक

त्यानुसार विद्यार्थिनीने समर्थ नर्सिंग कॉलेजला आपला प्रवेश घेतला होता.

दरम्यान, गतवर्षी विद्यार्थिनी एका विषयात नापास झाल्याने या विषयाच्या परीक्षेचे हॉल तिकीट आणण्यासाठी ती ४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास कॉलेजला गेली. हॉल तिकीट देण्याची मागणी करताच संस्था चालक मुंडे यांनी तुला मागील फीस भरावी लागेल, असे म्हणत जातिवाचक शिवीगाळ केली व विद्यार्थिनीला हॉल तिकीट दिले नाही. त्यामुळे विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसानही झाले आहे. याप्रकरणी विद्यार्थिनीच्या फिर्यादीवरून वडवणी पोलिस ठाण्यात समर्थ नर्सिंग कॉलेजचे संस्था चालक दिलीप रघुनाथ मुंडे यांच्याविरुद्ध ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास माजलगाव उपविभागीय पोलिस अधिकारी शैलेश गायकवाड करीत आहेत.

## घरफोडी करणाऱ्या

रहाडे, दिलीप राठोड, विलास कांदे यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनिय माहितीच्या आधारे प्रथमेश किसन जाधव (२०, रा. पंचशीलनगर, बीड) यास ताब्यात घेतले.

त्याने प्रारंभी उडवाउडवीची उत्तरे दिली मात्र त्याला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्ह्याची कबुली दिली, त्याच्याकडून मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे.सीसीटीव्ही फुटेजवरुन शिवाजीनगर पोलिसांना दोघांवर संशय होता. त्यातील प्रथमेश जाधव याला चौकशीकरिता ताब्यात घेतले असता त्याने आपण हा गुन्हा केलाच नसून त्याच्या ओळखीच्या दुसऱ्या एकाने केल्याचे पोलिसांना सांगितले. तसेच त्याच्याबाबत माहिती देखील देतो असे तो म्हणाला. त्यानुसार पोलिसांनी दोन्ही शक्यतांवर तपास केला. पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी स्वतः या तपासात लक्ष दिल्यानंतर प्रथमेश हाच आरोपी असल्याचे समोर येताच त्याच्या घराची देखील घडती घेतली असता मुद्देमाल आढळून आला.

प्रथमेश हा नशेच्या आहारी गेलेला असून त्याने यापूर्वी देखील घरफ ोडी, चोरी यासारखे गुन्हे केलेले आहेत. त्याला अटक केल्यानंतर त्याने यापूर्वीच्या गुन्ह्यासह आणखी एका गुन्ह्याची माहिती दिली असून त्याचा देखील तपास आता केला जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक किशोर पवार यांनी सांगितले.

## ग्रामसेवकाला धमकी

(रा. पिंपळटक्का, ता. वडवणी) हा अचानक उभा राहून फिर्यादी व सरपंच यांच्याशी अरेरावीची भाषा करू लागला. ग्रामसभा बंद करा, तुम्ही खोटे काम करता असे म्हणून त्याने शिवीगाळ केली आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला.या प्रकरणी वडवणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस कर्मचारी केदार करत आहेत.

## बार्शी नाक्यावर दीड

तेव्हा बीड शहराकडे पाली आणि परळीकडे जाणार्या तिन्ही रस्त्यांवर वाहनांच्या रांगाच रांगा पहायला मिळाल्या. या रस्त्यावरून प्रवास करणार्यांना तब्बल एक ते दीड तास या वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले. वाहतूक कोंडी नेमकी कशामुळे झाली? हे मात्र समजू शकले नाही. परंतु वाहतूक पोलीस जागेवर असते तर एवढावेळ वाहतूक कोंडी झाली नसती, असे उपस्थितांचे सांगणे होते.

## राजस्थान राज्यात

दंडाची शिक्षा होऊ शकते. यासंदर्भातील सर्व गुन्हे अजामीनपात्र असतील. त्यांची सुनावणी सत्र न्यायालयात होईल. महत्वाचे म्हणजे, या कायद्यातील सर्वात कठोर तरतूद म्हणजे, सामूहिक धर्मांतरण. या कायद्यानुसार, ज्या ठिकाणी सामूहिक धर्मांतरणाचा गुन्हा घडला असेल, ती इमारत अथवा ते ठिकाण बुलडोझरने पाडण्याची तरतूद आहे. अशा प्रकारची तरतूद देशातील अन्य कोणत्याही धर्मांतरण कायद्यात नाही. यामुळे राजस्थानचा कायदा सर्वात कठोर मानला जात आहे.

'घरवापसी'ला धर्मांतरण माणण्यात येणार नाही -

याशिवाय, या कायद्यानुसार, 'घरवापसी'ला धर्मांतरण मानण्यात येणार नाही. अर्थात, मूळ धर्मात परत येणे गुन्हा ठरणार नाही. सत्ताधारी भाजपने या निर्णयाचे स्वागत केले असून, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांचे आभार मानले आहेत. जबरदस्तीच्या धर्मांतरांवर यामुळे लगाम बसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

कॉंग्रेस आणि भारत आदिवासी पक्ष (इ-झ) आदींनी विरोधी पक्षांनी या कायद्यावर जोरदार टीका केली आहे. हा कायदा संविधानातील धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. यामुळे समाजातील ध्रुवीकरण वाढवेल, असे त्यांनी म्हटले आहे. हा कायदा लागू होताच, अनेक सामाजिक संघटनांनी याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचीही तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे, देशभरातील १२ राज्यांमध्ये आधीच धर्मांतरण कायदा लागू आहे. ती प्रकरणंही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत

## बीएएमएस चा

निमखेडकर दवाखाना उघडा ठेवून तेथून पसार झाले. मात्र या छाप्यादरम्यान मंडल नामक डॉक्टर तेथे आढळून आला. बंगाली डॉक्टराच्या बॅगेची झडती आरोग्य कर्मचारी यांनी घेतली. यावेळी त्यांना नियमबाह्य औषधी व साधने मिळाली. त्याच्या कागदपत्रांची, तसेच परवानगीची माहिती पथकाने घेतली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.त्याच्याकडे बीएएमएस अर्थात बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन ऍण्ड सर्जरी अशी डिग्री आवश्यक असताना त्याने बोर्डावर बीएएमएस अर्थात 'बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन ॲण्ड सिस्टिम' असे लिहिल्याचे दिसून आले. त्याला त्याबाबत विचारणा केली असता, आपण हेच बीएएमएस असल्याचे सांगितल्यानंतर पथकाला संशय बळावला होता. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जाफर तडवी यांनी त्याची कागदपत्रे ताब्यात घेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र सोनवणे यांच्याकडे दिली आहे. या कागदपत्रांची तपासणी महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल करणार असल्याची माहिती आहे. कागदपत्रे खोटी निघाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अनेक ठिकाणी बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट आहे. याबाबत आमदार आमश्या पाडवी यांच्यासह विविध संघटनांनी आवाज उठवला आहे.राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर नंदुरबार जिल्हा दौऱ्यावर आले असता बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. यापुढे नंदुरबार तालुक्यात कारवाई सुरू राहील असं डॉक्टर जाफर तडवी यांनी सांगितलं.